**अधिकार अभिलेखात पिक कर्जाची नोंद दाखल व कमी करतांना वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँक यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 150 (2) नुसार वर्दी नोटीस न बजाविता "आदेशाने" हा प्रकार निवडून नोंदी घेणेबाबत.**

# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

परिपत्रक क्र.कुळका/1/ई-टपाल/2019/36/56/१०५४

दिनांक १०/12/2019

शेतक-यांच्या दृष्टीने खरीप व रब्बी हंगाम महत्वाचा मानला जातो. या हंगामाकरीता शेतक-यांना पैशांची नितांत आवश्यकता असते. वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकामार्फत शेतक-यांना पिक कर्ज व पिक कर्जाचे पुर्नगठण केले जाते. शेतक-यांना वेळेत पीक कर्ज मिळाले तर शेतक-यांना बियाणे, खते, किटकनाशके इ. करीता पैसा उपलब्ध होऊ शकतो.

एखादा खातेदार स्वत:च्या जमिनीवर एखाद्या वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेकडून, शेतीच्या विकासासाठी, जमीन तारण ठेऊन, कर्ज घेतो म्हणजेच तो त्या वि.का.स. सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेसोबत शेतीच्या विकासासाठी कर्ज घेऊन परतफेडीचा करार करतो किंवा परतफेड करण्याचे वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेला घोषित करतो किंवा वि.का.स. सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेसोबत कर्जफेडीसाठी प्रतिबध्द होतो.

महाराष्ट्र सहकारी सोसायटी कायदा १९६० व नियम १९६१, कलम १३६ अन्वये सहकारी संस्था/बँका तसेच महाराष्ट्र कृषी वित्तपुरवठा कायदा १९७५ अन्वये सार्वजनिक बँकांनी दिलेल्या कर्जाची नोंद, प्रमाणपत्र क्रमांक, तारीख व कर्ज तपशील देऊन इतर अधिकारात नोंदविता येते.

जेव्हा एखादा खातेदार एखाद्या वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेकडून शेतीच्या विकासासाठी कर्ज घेतो व कमी करतो तेव्हा झालेला करार वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँक तलाठी यांना कळवते. याबाबतची कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर तलाठी गाव नमुना ६ मध्ये इतर अधिकारात पिक कर्जाची नोंद दाखल व कमी करतात. ई-फेरफार प्रणालीत फेरफार मंजुर होण्यासाठी 15 दिवसाचा कालावधी लागत असल्याने तलाठी यांना शेतक-यांच्या रोषास सामोरे जावे लागते. तसेच त्यामुळे शेतक-यांमध्ये शासनाची प्रतिमा मलिन होते.

पिक कर्ज मिळवण्यासाठी शेतक-यांना त्रास होऊ नये याकरीता एखाद्या शेतक-याने तलाठी यांचेकडे स्वत: अर्ज आणून दिल्यास तलाठी यांनी कागदपत्रांची खात्री करुन अधिकार अभिलेखात पिक कर्जाची नोंद दाखल व कमी करतांना सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँक यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 150 (2) नुसार वर्दी नोटीस न बजाविता

त्यांचे पत्रानुसार "आदेशाने" हा प्रकार निवडून नोंदी घ्याव्यात. मंडळ अधिकारी यांनी देखील कागदपत्रांची खात्री करुन आदेशाने असा शेरा घेऊन सदर नोंदी प्रमाणित कराव्यात. नोंद प्रमाणित झाल्यानंतर शेतक-यांना तात्काळ 7/12 उतारा उपलब्ध करुन द्यावा. मंडळ अधिकारी यांना नोंद प्रमाणित करतांना शंका उपस्थित झाल्यास वि.का.स.सोसायटी, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेकडे तात्काळ पत्रव्यवहार करावा व सदर नोंदीवर लवकरात लवकर निर्णय घ्यावा. तसेच पिककर्जाच्या नोंदी दाखल व कमी करतांना तलाठी व मंडळ अधिकारी यांनी शेतक-यांना अनावश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात येऊ नये व त्यांना सौजन्याची वागणूक द्यावी. यामुळे शेतक-यांना पिककर्ज उपलब्ध होण्याच्या प्रक्रीयेत अधिकाधिक शिथिलता येऊन शेतक-यांना आर्थिक दिलासा मिळण्यासाठी पिक कर्जाचा जलदगतीने पुरवठा होण्यास मदत होईल.

**सदर परीपत्रक फक्त पिक कर्जासाठी लागु असुन अन्य कोणत्याही कर्जासाठी लागु होणार नाही. अन्य कर्जासाठी कायद्यातील प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी** तसेच सदर परीपत्रकाची तलाठी व मंडळ अधिकारी यांनी तंतोतंत अंमलबजावणी करावी.

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी जळगांव**

**प्रत** :- व्यवस्थापक, अग्रणी बँक, जळगांव यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

**प्रत** :- उपविभागीय अधिकारी सर्व

तहसिलदार सर्व

2/- आपले अधिनस्त तलाठी व मंडळ अधिकारी यांना सदर परीपत्रकानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात याव्यात व फिरस्ती दौ-याचे वेळी सदर परीपत्रकाची अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी.

**जिल्हाधिकारी जळगांव**